पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६७ ■ बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com







## ‘बिस्मिल की महफिल’च्या नावाने अकोलेकरांना ‘सुफी’ संगीताचा झासा

# लगावला 50 लाखांचा चुना ?


प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** शहरात मोठ्या थाटामाटात आयोजित करण्यात आलेल्या ’बिस्मिल की महफिल - मैं हूं सुफी’ या कार्यक्रमाच्या नावाखाली अकोलेकरांची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याची खळबळजनक चर्चा सध्या सुरू आहे. आयोजकांनी संगीताच्या नावाखाली अकोल्यातील रसिक प्रेक्षकांना तब्बल ५० लाख रुपयांचा गंडा घातल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. आयोजकांनी ज्या कमिटमेंटच्या आधारे लाखो रुपये जमा केले त्याची पुर्तता तर सोडा कुठलीच व्यवस्था न करता आयोजक कार्यक्रमाच्या स्थळावरुन गायब झाले होते. या सर्व प्रकरणात अशा प्रकारच्या खाजगी मैफिलीचे आयोजन करणाऱ्यांवर कुठलाही निर्बंध नसल्याने व प्रशासनाचा कुठलाही वचक नसल्याचे दिसून आले. त्यामुळे आयोजकांच्या विरोधात कुठे तक्रार करावी हा मोठा प्रश्न फसवणुक झालेल्यांना पडला आहे. या विषयावर आयोजकांशी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.




प्रसिद्ध सुफी गायक बिस्मिल यांच्या नावावर आधारित या कार्यक्रमाचा जोरदार प्रचार करण्यात आला. शहरातील प्रमुख ठिकाणी होर्डिंग्स, सोशल मीडियावर जाहिराती, तसेच तोंडी प्रचाराच्या माध्यमातून रसिकांमध्ये उत्सुकता निर्माण करण्यात आली. बिस्लिम केवळ तीस मिनिटे गायला आणि निघुन गेला. त्यामुळे ज्या आधारावर पैसा जमा करण्यात आला होता त्याचे कुठले ही रिटर्न दर्शकांना गायकांना मिळाले नाही. आयोजकांनी जास्तीत जास्त रक्कम गोळा करण्याच्या उद्देशाने विविध श्रेणीतील अत्यंत महागडी व ‘लॅव्हिश’ पॅकेजेस जाहीर केली होती. पण, त्या पॅकेज नुसार कुठलिही व्यवस्था आयोजकांनी केली नव्हती. तर ज्या मद्य विक्रेत्याला या विषयीची परवानगी दिली होती त्यांनी तर आयोजकांना आवश्यक तो सर्व साठा दिला होता. तर मग ज्या ग्राहकांसाठी हे आयोजन होते त्यांच्या पर्यंत ते का पोहचले नाही असा प्रश्न उपस्थित होतो. सुफी संगीताच्या नावाखाली रसिकांच्या भावनांशी आणि खिशाशी खेळ करणाऱ्या या कथित आयोजकांवर कायदेशीर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण अकोल्याचे लक्ष लागले आहे.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?




’इल्यूजन स्पार्क एंटरटेनमेंट्स’ यांच्या मार्फत २० डिसेंबर रोजी अकोल्यातील एका प्रतिष्ठित हॉटेल मध्ये भव्य कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. ११ नोव्हेंबरपासून या कार्यक्रमाची तिकीट विक्री स्टेशन रोडवरील एका रेस्टॉरंटमध्ये सुरू करण्यात आली होती. आयोजकांनी जास्तीत जास्त पैसे उकळण्यासाठी विविध श्रेणीतील ’लॅव्हिश’ पॅकेजेस जाहीर केली होती. एलिट लाउंज या पॅकेज मध्ये १० पाहुण्यांसाठी प्रीमियम बॉटल्स, बिअर आणि बट्लर सुविधेसह खास व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले होते. तर प्राईम आणि क्लासिक लाउंज यामध्येही ६ ते ८ लोकांसाठी खाण्यापिण्याच्या सोयींसह महागडी तिकिटे विकली गेली. ज्या आश्वासनांवर लाखो रुपयांच्या तिकिटांची विक्री झाली त्या आश्वासनाचे स्टार्टर देखील तिथे नव्हते. प्लॅटिनम आणि गोल्ड या सामान्य श्रेणीतील तिकिटांचीही मोठ्या प्रमाणावर विक्री करण्यात आली होती.

### अकोलेकरांची फसवणूक

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमाच्या नावाखाली ५० लाखांहून अधिक रक्कम जमा करण्यात आली. मात्र, ऐनवेळी कार्यक्रमाचे नियोजन कोलमडल्याने किंवा आयोजकांनी काढता पाय घेतल्याने अकोलेकरांना आपल्या कष्टाच्या पैशांवर पाणी सोडावे लागले आहे. ’लिमिटेड कॅपॅसिटी’चे आमिष दाखवून आणि मोठ्या ब्रँड्सची नावे वापरून हा बनाव रचण्यात आल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणी फसवणूक झालेले नागरिक आता पोलीस प्रशासनाकडे धाव घेण्याच्या तयारीत असून, आयोजकांचा शोध सुरू आहे. केवळ अर्धातासात बिस्मिल यांनी सादरीकरण केले आणि लगेच ते निघुन गेले. त्यामुळे मोठी फसवणूक या माध्यमातून झाल्याची ओरड आहे. गायक बिस्मिल यांनी पुर्ण सादरीकरण का केले नाही, त्याच बरोबर आयोजकांनी तिकिट विक्री करताना जे जे कमिटमेंट केले होते ते का पुर्ण केले नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा

## ‘चुकाल तर संपाल‘ उद्धव ठाकरे

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक वळण आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ज्या क्षणाची शिवसैनिक आणि मनसे सैनिक वाट पाहत होते, तो क्षण अखेर उजाडला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबईत एका संयुक्त पत्रकार परिषदेत आपल्या युतीची अधिकृत घोषणा केली. ’आता चुकाल तर संपाल,’ असा स्पष्ट इशारा देत उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मराठी माणसांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

युतीची घोषणा करण्यापूर्वी दोन्ही नेत्यांनी एकाच गाडीने प्रवास करत शिवाजी पार्क येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन दर्शन घेतले. यावेळी आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे हे देखील उपस्थित होते. स्मृतीस्थळावर दोन्ही बंधूंना एकत्र पाहण्यासाठी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती.पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे अत्यंत आक्रमक पवित्र्यात दिसले. ते म्हणाले, ’संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात प्रबोधनकार ठाकरे आघाडीवर होते. आज पुन्हा एकदा मुंबईचे लचके



तोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जे मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे स्वप्न पाहत आहेत, त्यांचा राजकारणातून खात्मा केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.’भाजपच्या ’बटेंगे तो कटेंगे’ या नाऱ्यावर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, ’मी मराठी माणसांना सांगतो, आता फुटू नका, तुटू नका. आता जर आपण विभागले गेलो तर पूर्णपणे संपून जाऊ.

### शिवसेना-मनसे युतीचा अकोल्यात जल्लोष

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेली शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीची अखेर बुधवारी घोषणा झाली. अकोल्यात देखील या युतीच्या नेत्यांनी पेढे वाटून जल्लोष साजरा केला. शिवसेना कार्यालयत झालेल्या युतीचे थेट प्रसारण दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी एकत्र पाहिले. युतीनंतर फटाक्यांची आतिषबाजी करत, एकमेकांना पेढे भरवित हा ऐतिहासिक सण जल्लोषात साजरा केला गेला.





सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# अवघ्या ४ तासात १०२६ अर्जांची उचल

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज पहिल्याच दिवशी उमेदवारांचा प्रचंड प्रतिसाद पाहायला मिळाला आहे.

सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतच्या अवघ्या चार तासांत तब्बल १,०२६ नामनिर्देशन अर्जांची उचल झाल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पहिल्याच दिवशी झालेली ही विक्रमी अर्जउचल आगामी मनपा निवडणूक अत्यंत चुरशीची ठरण्याचे संकेत देत आहे. विविध राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज उचलल्याचे चित्र आहे.

# 'एक दिवस सैनिकांसाठी' अभियान राबविणार –जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी २४ डिसेंबर

♦ सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ व माजी सैनिक मेळावा संपन्न



**अमरावती** : भारतमातेच्या संरक्षणार्थ आपल्या जीवाची पर्वा न करता अविरत देश सेवा करणारे सैनिक, शहिदांचे कुटुंबीय, वीरमाता, वीरपत्नी, त्यांचे पाल्य यांना जिल्हा प्रशासनाची मदत व्हावी, यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी, 'एक दिवस सैनिकांसाठी' हे अभियान राबविण्यात येईल. जिल्हा प्रशासनाच्या वतीने संबंधित विभाग त्यांचे प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी सहकार्य करतील, असे आश्वासन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत सशस्त्र सेना ध्वज दिन-२०२५ निधी संकलन समारोहाचा शुभारंभ जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गजरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. प्रकाश ठाकरे, जिल्हा सैनिक अधिकारी आनंद पाथरकर आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, आपले सैनिक सीमेवर देश संरक्षणार्थ लढत असतात. रात्रंदिवस देशासाठी लढा देणाऱ्या सैनिकांप्रती आपल्याला अभिमान आहे. देशाची अखंडता, प्रगती, देशाचे अस्तित्व यांचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांचे आपण सर्व ऋणी आहोत. देशसेवा करताना ते आपल्या कुटुंबियांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही. महसूल, मोजणी, कृषी, पोलीस विभाग अशा विविध शासकीय कार्यालयांकडे त्यांची प्रलंबित असलेली कामे तातडीने पूर्ण व्हावीत, यासाठी दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'एक दिवस सैनिकांसाठी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. येथे सैनिक बांधवांचे तसेच त्यांच्या कुटुंबियांचे प्रश्न सोडविण्यात येतील. सैनिक बांधव तसेच त्यांच्या कुटुंबियांनी आपल्या तक्रारी जिल्हा सैनिक अधिकारी आनंद पाथरकर यांच्याकडे नोंदवाव्यात. एक दिवस सैनिकांसाठी या अभियानांतर्गत या तक्रारींवर कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. भारत देशाला १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्त झाले. तेव्हा इतरही जवळपासचे देश स्वतंत्र झाले. परंतु इतर देशांपेक्षा आपला देश 'विकसित देश' म्हणून आज नावारूपाला आलेला आहे. हे केवळ भारतीय सैनिकांचे दृढ मनोबल व इच्छाशक्तीमुळे शक्य झाले आहे. भारतीय सेना बल देशाला कोणत्याही संकटातून बाहेर काढू शकते, हा भारतीयांचा दृढ विश्वास आहे. सैनिक बांधव सीमेवर लढत आहे, त्यामुळेच आपण स्वातंत्र्याची अनुभूती घेत आहोत. यातून सैनिकांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य, सामाजिक कार्यासाठी हा निधी खर्च करण्यात येतो. मागील वर्षी अमरावती जिल्ह्याने दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा जास्त ध्वजनिधी संकलित केला. यावर्षी देखील दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक ध्वजनिधी जमा करण्यासाठी आपण सर्व एकत्रितरित्या प्रयत्न करूया. यावर्षी ३ कोटी रुपये ध्वजनिधी जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवूया, असा विश्वास जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी यावेळी व्यक्त केला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेमार्फत ध्वजदिन निधी संकलनासाठी २५ लक्ष रुपयांचा धनादेश यावेळी सुपूर्द करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वीर पत्नी श्रीमती वनमाला, श्रीमती कांताबाई, श्रीमती नूतन, श्रीमती सरस्वती, श्रीमती सुनिता, श्रीमती मनुताई, श्रीमती रेणुका तसेच वीर माता श्रीमती रंभाई, श्रीमती बेबीताई ऊईके तसेच श्रीमती पथोड यांना सन्मानित करण्यात आले. विशेष गौरव पुरस्काराने माजी सैनिक भावे किशोर उत्तम यांचा मुलगा स्वराज, श्रीमती वर्षा रमेश खडसे यांची मुलगी सावी, संतोष खंडूजी श्रीनाथ यांचा मुलगा आदित्य, वनकर अनिल खंडुजी यांची मुलगी निहारिका, तायडे वासुदेव व्यंकटराव यांचा मुलगा पियुष, विनोद बाबूलाल वानखडे यांची मुलगी संस्कृती यांना विशेष पुरस्काराने यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, शौर्यपदकधारक, त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# जागतिक कौशल्य स्पर्धेची विभागीय पात्रता फेरी आज

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अमरावती :** व्यावसायिक शिक्षण आणि जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून अमरावतीत उद्या, २४ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक कौशल्य स्पर्धा विभागीय पात्रता फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार भवन येथे ही स्पर्धा पार पडणार असून, जिल्हास्तरावर निवड झालेल्या उमेदवारांनी या विभागीय फेरीत आपले कौशल्य सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राने केले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा ही दर दोन वर्षांनी होणारी जगातील सर्वात मोठी कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा आहे. २३ वर्षांखालील तरुणांसाठी ही स्पर्धा एखाद्या ऑलिम्पिक खेळाप्रमाणेच प्रतिष्ठेची मानली जाते. आगामी २०२६ ची जागतिक कौशल्य स्पर्धा चीनमधील शांघाय येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उमेदवारांची निवड जिल्हा, विभाग, राज्य आणि त्यानंतर देश पातळीवर केली जाणार आहे. यापूर्वी पार पडलेल्या ४७ व्या जागतिक कौशल्य स्पर्धेत ६३ सेक्टरमधून ५० देशांतील १० हजारांहून अधिक उमेदवारांनी सहभाग नोंदविला होता.

# आमदार किरण सरनाईक यांचा हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते सत्कार



प्रतिनिधी २४ डिसेंबर

**दर्यापूर:** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथे डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्सव, स्नेहसंमेलन, सौर ऊर्जा प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा निमित्त कार्यक्रम प्रसंगी शिक्षक आमदार किरण राव सरनाईक यांचा संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन जी देशमुख यांच्या हस्ते शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी श्री हर्षवर्धनजी देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती समवेत परिषद सदस्य हेमंत दादा काळमेघ, माजी उपाध्यक्ष डॉक्टर रामचंद्र शेळके समिती सदस्य मुळे मॅडम व इतर मान्यवर दिसत आहे.

# पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन कौशल्य विकास प्रशिक्षण

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अमरावती :** नव्य शैक्षणिक धोरणानुसार उच्चशिक्षण क्षेत्र आणि अभ्यासक्रमांतर्गत मूलभूत बदल झाले असून कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. स्पर्धेच्या युगात युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासह त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर करणे काळाची गरज असून त्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी उद्यानविद्या विभागांतर्गत रोपवाटिका व्यवस्थापन व शोभिवंत झाडांचे उत्पादन हा कौशल्य विकास शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी शोभिवंत झाडांची निर्मिती, विक्री तसेच अर्थशास्त्र या बाबत कौशल्य आत्मसात करत असून भविष्यातील कुशल व्यवसायिक उद्योजक या कृषी महाविद्यालयात घडत आहेत. पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिकावर आधारित व कौशल्य विकासाच्या दृष्टीने अभ्यासक्रम राबविला जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे.

रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन हा कौशल्य विकास अभ्यासक्रम उद्यानविद्या विभागाचे प्रा. डॉ. स्वप्नील ज्ञानेश्वर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उपप्राचार्य प्रा. नितेश चौधरी यांचे सहकार्य व मार्गदर्शन देखील विद्यार्थ्यांना मिळत आहे.

# संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा दीप उजळवणारे श्रीरामचंद्र संस्थान – विवेक गुल्हाने

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**नांदगाव पेठ:** संत गाडगेबाबांनी समाजाला दिलेली स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती व मानवसेवेची दशसूत्री आजच्या काळातही तितकीच मार्गदर्शक आहे. याच विचारांचा वारसा जपत श्रीरामचंद्र संस्थान, नांदगाव पेठ यांच्या वतीने राबविले जाणारे सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रम हे संत गाडगेबाबांच्या कार्याची जिवंत साक्ष ठरत आहेत, असे प्रतिपादन भाजपा चे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी केले.संत गाडगेबाबांनी दिलेली दशसूत्री ही केवळ उपदेश नसून समाज उभारणीचा ठोस आराखडा आहे. आजच्या बदलत्या काळात संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करणे ही काळाची गरज असून, त्यातूनच सुसंस्कृत, सक्षम आणि समताधिष्ठित समाज घडू शकतो असेही ते म्हणाले. श्रीरामचंद्र संस्थान येथे आयोजित थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात गुल्हाने प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. श्रीरामचंद्र संस्थानचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम श्रीरामचंद्र मंदिरात भक्तिमय वातावरणात पार पडला.यावेळी कार्यक्रमाला श्रीमती शांताबाई शेंदरकर, सुरेशराव शेंदरकर, पंजाबराव क्षीरसागर, सुखदेवराव कापडे गुरुजी, भाजपा तालुकाध्यक्ष वीरेंद्र लंगडे, भाजयुमो तालुकाध्यक्ष विजय भुयार यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

♦ संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त गरजूंना ब्लँकेटचे वितरण



यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने यावेळी शंभरपेक्षा अधिक गरीब व गरजू नागरिकांना मान्यवरांच्या हस्ते ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे थंडीच्या दिवसांत गरीब व गरजूंना मोठा दिलासा मिळाला. विशेष म्हणजे, या सामाजिक कार्यात भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी वैयक्तिक पुढाकार घेत ४० ब्लँकेटचा सहभाग देत उपक्रमाला मोलाचा हातभार लावला. या सेवाभावी उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी मनापासून कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या विचारांची आजच्या समाजाला अधिक गरज असल्याचे नमूद केले.'संत गाडगेबाबा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते लोकशिक्षणाचे चालते-बोलते विद्यापीठ होते. त्यांनी शब्दांपेक्षा कृतीवर भर दिला आणि समाजाला स्वच्छता, व्यसनमुक्ती, शिक्षण व समतेचा मार्ग दाखवला. संत गाडगेबाबांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नाहीत, तर आचरणात आणण्यासाठी आहेत. त्यांच्या तत्वांचा अवलंब केल्यास व्यक्ती, कुटुंब आणि समाजाचा सर्वांगीण विकास निश्चित साधता येईल,' असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी केले. दोन दशकानंतर नांदगाव पेठ येथे विदर्भस्तरीय भव्य शंकरपटाचे यशस्वी आयोजन करणाऱ्या युवा शेतकरी मित्र परिवार आणि स्व.सौ.हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट च्या सर्व पदाधिकाऱ्यांचा यावेळी संस्थानच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मंदिरात महाआरती करण्यात आली तसेच भाविकांना रामखिचडीचे वाटप करण्यात आले.संपूर्ण कार्यक्रमात 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' च्या गजराने वातावरण भक्तिमय झाले होते. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या गुन्हेगारास घातक शस्त्रासह घेतले ताब्यात

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहिती मिळाली की, मुदस्सीर अहेमद रेकॉड वरील गुन्हेगार हा राजपुत ढाबा ते वलगाव रोड वरील हनुमान मंदिर जवळ स्वतःचे कमरेला लोखंडी कोयता लावुन गुन्हा करण्याचे उद्देशाने जाण्याचे तयारीत उभा आहे.

अशा मिळालेल्या माहीती वरून मा.पो.नि. संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे मुदस्सीर अहेमद मोहम्मद फिरोज वय २० वर्षे रा कसाबपुरा, वलगाव, अमरावती यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक लोखंडी कोयता जप्त करून सदर इसमा विरूध्द पोलीस स्टेशन राजापेठ येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव मुदस्सीर अहेमद मोहम्मद फिरोज वय २० वर्षे कसाबपुरा, वलगाव, अमरावती असे असून त्याच्या ताब्यातून



एक लोखंडी कोयता, कि.अ. १,२००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई मा. पोलीस आयुक्त . राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक . संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलीस सपोनि महेश इंगोले, अंमलदार गजानन देवले, मनोज ठोसर, मंगेश परीमल, संग्राम भोजने, नईम मिर्झा, विकास गुडधे, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, प्रभास पोकळे यांनी केली आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेत आज अविनाश पाटील यांचे व्याख्यान

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अमरावती:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त 'डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेत उद्या बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ ला सायंकाळी ५ वाजता अविनाश पाटील, अध्यक्ष, विकासनामा फाउंडेशन, धुळे यांचे 'भारतीय संविधान व लोकशाही पुढील आव्हान ' या विषयावर व्याख्यान होईल.या व्याख्यानाचे आयोजन श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाने केले असून या व्याख्यानाचा विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष तथा व्याख्यानमाला आयोजन समितीचे अध्यक्ष अॅड.जे.व्ही.पाटील पुसदेकर व सचिव प्राचार्य डॉ. अंबादास कुलट यांनी केले आहे.

## सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# महसूल कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन; 'त्या' कारवाईचा निषेध

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**खामगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन प्रकरणात जबाबदारी निश्चित करीत दोन ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले. या कारवाईच्या निषेधार्थ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी व तलाठ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात जिल्ह्यातील एकूण ७२६ तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचा सहभाग असून, निलंबन कारवाई एकतर्फी व अन्यायकारक असल्याचा आरोप संबंधित संघटनांकडून करण्यात येत आहे. या कारवाईमुळे ग्राम महसूल व मंडळ अधिकाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, कामबंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, २२ डिसेंबर रोजी खामगाव तालुक्यातील विदर्भ पटवारी संघटनेच्या वतीने तहसीलदार कार्यालयात डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्रे सुपूर्द करण्यात आली. प्रशासनाने या कारवाईचा फेरविचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. संघटनांच्या मते, गौण खनिजाचे अवैध उत्खनन प्रकरणांमध्ये जबाबदारी ठरविताना वरिष्ठ अधिकारी व संपूर्ण यंत्रणेची भूमिका तपासणे आवश्यक असून, केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे योग्य नाही. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे

# अपघातात १९ वर्षीय विद्यार्थीनी ठार

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**खामगाव :** ट्रॅक्टर आणि दुचाकीच्या अपघातात १९ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना २३ डिसेंबर रोजी किन्ही महादेव फाट्याजवळ घडली. मृत विद्यार्थिनी ही उमरा अटाळी येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,उमरा अटाळी येथील गौरी सुरेश महानकर (१९) ही विद्यार्थिनी मैत्रिणीच्या भावाच्या दुचाकीने अंत्रज येथे परीक्षा देण्यासाठी जात होती. यावेळी किन्ही महादेव फाट्याजवळ चुकीच्या दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गौरी महानकर ही गंभीर जखमी झाली. अपघातानंतर तिला तातडीने उपचारासाठी खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. दरम्यान, दुचाकीवर गौरी महानकरसह तिची मैत्रीण आणि मैत्रिणीचा भाऊ असे तिघे जण प्रवास करत होते. या अपघातात गौरीचा मृत्यू झाला असून, तिची मैत्रीण आणि तिचा भाऊ हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी खामगाव येथील रुग्णालयात आले.

# बालकावर अत्याचार; आरोपीस २० वर्षे कारावास

♦ खामगाव न्यायालयाचा निकालः ८० हजारांचा दंड !

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**खामगाव :** विशेष बाल प्रकरणात दाखल असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात खामगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालय क्र. १ यांनी आरोपी योगेश संतोष आवारे (रा. टेंभुर्णा) याला दोषी ठरवत २० वर्षांचा सश्रम कारावास व ८० हजार रुपयांचा दंड अशी कठोर शिक्षा सुनावली.

हा गुन्हा पोलिस स्टेशन खामगाव अंतर्गत ०४ जून २०२२ रोजी नोंदविण्यात आला होता. आरोपीने घटनेच्या वेळी अवघ्या १० वर्षाच्या अल्पवयीन बालकाशी अनैसर्गिक कृत्य केल्याचा आरोप होता. या प्रकरणात न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित करून २८ जानेवारी २०२५ पासून साक्ष नोंदविण्यास सुरुवात केली. सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. यामध्ये पीडित बालक, त्याची आई, वैद्यकीय अधिकारी, दुकानदार, जप्ती पंचनाम्याचे साक्षीदार तसेच घटनास्थळावरील साक्षीदार यांचा समावेश होता. सर्व साक्षीदारांची साक्ष विश्वासार्ह ठरली. तपासादरम्यान तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी अभिनव त्यागी व अमोल कोळी यांनी निष्पक्ष व वस्तुनिष्ठ तपास केला. पीडित बालकाच्या जातीचे प्रमाणपत्र संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांकडून निर्गमित असल्याचा ठोस पुरावादेखील न्यायालयात सादर करण्यात आला. सश्रम कारावासाची शिक्षा एकत्रितपणे भोगावयाची आहे. आरोपी हा ०८ जून २०२२ पासून बुलढाणा जिल्हा कारागृहात असल्याने, कालावधीचा त्या लाभशिक्षेमध्ये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. ठोठावण्यात आलेल्या ८० हजार रुपयांच्या दंडापैकी ७५ हजार रुपये पीडित बालकास देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता उदय आपटे यांनी प्रभावीपणे युक्तिवाद केला. खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनच्या महिला साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंदा शिंदे व साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुधीर काळे यांनी कोर्ट पैरवीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

# खामगावातील अर्जन खिमजी स्कूलमध्ये पेन्शनर्स डे उत्साहात साजरा

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**खामगाव :** खामगाव क्रियाशील पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने पेन्शनर्स डे निमित्त विशेष सभा स्थानिक श्री अर्जन खिमजी नॅशनल हायस्कूलमध्ये पार पडली. अध्यक्षस्थानी भानुदास हुरसाड होते. प्रमुख अतिथी म्हणून स्टेट बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक सुबोध कुमार, सेवानिवृत्त अपर कोषागार अधिकारी बबन ईटे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता उत्तमराव पदमने तसेच उपाध्यक्ष तुकाराम निखाडे उपस्थित होते.मागील आमसभेचे इतिवृत्त श्रीकृष्ण कळमकर यांनी, तर त्रैमासिक सभांचे इतिवृत्त रवींद्र खर्चे यांनी सादर केले. भगवान उमाळे व बेलोकार यांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. राष्ट्रगीत जाधव यांनी घेतले. कार्यक्रमासाठी चंद्रकांत निंबोळकर, रवींद्र खर्चे, बाबुराव धोरण, तुकाराम निखाडे, श्रीकृष्ण कळमकर, सदानंद खंडारे, वत्सला खुमकर, वामन पाटील, भीमराव इंगळे, माधव माहुलीकर, कसुरकर, निर्मळ, चितारे, गुरव व मो. फारुक यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सुरेश खर्चे यांनी केले, तर संचालन व मान्यवरांचा परिचय सुरेश खर्चे व रवींद्र खर्चे यांनी केला. आभार माधव माहुलीकर यांनी मानले.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिवस साजरा

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोट :** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये गणित दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाकरिता शाळेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुणकरन डागा,प्रमोद चांडक, शारदा लखोटीया, रेखा चांडक दीपम लखोटीया , प्रा.द्वारिका प्रसाद बसेर, कविता मिश्रा व सर्व गणित शिक्षक मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारताचे महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. त्यानंतर सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.वर्ग सातवीची विद्यार्थ्यांनी सावी रोठे हिने गणित दिनाची माहिती दिली.शाळेतील गणित शिक्षका गायत्री सोनखासकर यांनी विद्यार्थ्यांना गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनाविषयी माहिती सांगितली. कविता मिश्रा यांनी आपल्या जीवनात गणिताचे महत्त्व सांगुन हा दिवस कोणी साजरा करायला सांगितला याची माहिती विद्यार्थ्यांना दिली व गणित दिनावर शुभेच्छा दिल्या. या बहारदार कार्यक्रमाची रंगतदार संचालन व आभार प्रदर्शन शुभांगी कुकडे यांनी केले. व काही प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले. विद्यार्थ्यांनी सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे दिली. शाळेत महापुरुषांच्या स्मरणार्थ विविध स्पर्धा तसेच उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.

# 25 वर्षांच्या अतिक्रमणातून रस्त्याने घेतला मोकळा श्वास

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**बाळापूर :** वाडेगाव येथील पंचवीस वर्षांपासून अतिक्रमणात अडकलेल्या रस्त्यावरील अतिक्रमण अखेर हटविण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. मात्र या कारवाईमुळे काही नागरिकांमध्ये नाराजी उमटली.

वाडेगाव येथील सेंट्रल बँकेलगत असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने मागील सुमारे २५ वर्षांपासून या मार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद होती. या अतिक्रमणप्रकरणी संबंधित अतिक्रमणधारक व ग्राम प्रशासन यांच्यात वाद निर्माण होऊन हे प्रकरण विभागीय आयुक्तांकडे न्यायप्रविष्ट होते. सर्व बाबींचा सखोल विचार करून २५ ऑक्टोबर रोजी अप्पर आयुक्तांनी संबंधित रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याचे आदेश ग्राम प्रशासनाला दिले. सरपंच मेजर मंगेश तायडे यांनी दमदार कारवाई करत या आदेशाच्या अनुषंगाने दिनांक २० डिसेंबर रोजी ग्राम प्रशासनाकडून संबंधित रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान परिसरातील महिला व नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले. अतिक्रमण हटवण्यासाठी सरपंच मेजर मंगेश तायडे, उपसरपंच राजेश्वर पळसकार, माजी उपसरपंच सुनील घाटोळ, ग्रामपंचायत सदस्य मुजाहीद भाई, सुनील मानकर, डॉ. शेख चांद, प्रकाश मसने तसेच ग्रामविकास अधिकारी रवींद्र इंगळे सहकार्य केले. या कारवाईमुळे अनेक ग्रामस्थांनी ग्राम प्रशासनाच्या धाडसी निर्णयाचे सरपंच मेजर मंगेश तायडे , उपसरपंच राजेश्वर पळसकार, माजी उपसरपंच सुनील घाटोळ, ग्राम पंचायत सदस्य मो मुजाहिद कुरेशी, सुनील मानकर, डॉ. शेख चांद, प्रकाश मसने यांचे कौतुक केले आहे.

## राज्यस्तरीय शालेय बेसबॉल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन



प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला द्वारा राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धेचे आयोजन जसनागरा पब्लिक स्कूल रिधोरा येथे २३ ते २५ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून जसनागरा पब्लिक स्कूलचे संचालक सिमरनजीत सिंग नागरा, महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, अकोला जिल्हा बेसबॉल संघटनेचे सचिव नारायण बत्तुले, निवड समिती सदस्य राक्रिमा रेवन्ना शेलार, प्रा. संतोष खेंडे उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी उपस्थित खेळाडूंना क्रीडा क्षेत्रात करिअर कसे घडवायचे याबद्दल मार्गदर्शन केले.

पहिला सामना मुलांच्या गटात पुणे विभाग विरुद्ध लातूर विभाग दरम्यान झाला. यामध्ये पुणे ९-० ने विजयी झाला. दुसरा सामना नागपूर विभाग विरुद्ध अमरावती विभाग यांच्यात झाला यामध्ये अमरावती ७-१० ने विजयी झाला. तिसरा सामना मुंबई विभाग विरुद्ध कोल्हापूर विभाग यांच्यात झाला यामध्ये कोल्हापूर विभाग ०-१ ने विजयी झाला. चौथा सामना नाशिक विभाग विरुद्ध छत्रपती संभाजी नगर विभाग या दरम्यान झाला यामध्ये नाशिक विभाग विजयी झाला.

मुलींच्या वयोगटात झालेले सामने पुणे विभाग विरुद्ध छत्रपती संभाजी नगर यामध्ये पुणे विभाग ४-१ ने विजयी, नागपूर विभाग विरुद्ध अमरावती विभाग यामध्ये नागपूर विभाग ४-१ ने विजयी, कोल्हापूर विभाग विरुद्ध नाशिक विभाग यामध्ये नाशिक विभाग २-८ ने विजयी, लातूर विभाग विरुद्ध मुंबई विभाग यामध्ये मुंबई विभाग २-८ ने विजयी यामध्ये पंच म्हणून आकाश साबणे (परभणी), विक्की सारिसे (अमरावती), अकलिम शहा (अमरावती), तोफिक शहा (अमरावती), अभिजीत स्वर्गे (अमरावती), आरती भगत (कोल्हापूर), सायमा बाजवान (परभणी), रजत हिरोडे (अकोला), जहागीर शेख (लातूर) यांनी केले. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या निवासाची व क्रीडांगणाची व्यवस्था जसनागरा पब्लिक स्कूल मध्ये करण्यात आली. स्पर्धेचे नियोजन जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा मार्गदर्शक डॉ. नलिनी जाधव, डॉ. अभिजीत फिरके, राजेश गावंडे (जिल्हा संघटक), क्रीडा अधिकारी मनीषा ठाकरे, निशांत वानखडे, गजानन चारसे परिश्रम घेत आहेत असे जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट यांनी कळविले आहे.

## न्यू इंग्लिश हायस्कूलची नागपूर येथे शैक्षणिक सहल

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** येथील न्यू इंग्लिश हायस्कूलच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे एक दिवसीय शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत इयत्ता ५ वी ते ८ वी मधील ९२ विद्यार्थी व १५ शिक्षक सहभागी झाले होते. स्थळांची पूर्वमाहिती शशिकांत बांगर यांनी दिली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी स्थळ गुरुकुंज मोझरी येथे भेट दिली. नागपूर प्रवेशापूर्वी सुराबर्डी येथील गुफा हा होता. या ठिकाणाची माहिती गोपाल सांगूनवेढे यांनी दिली.

दीक्षाभूमी, नागपूर येथे विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची, विचारांची व बौद्ध धम्म स्वीकारण्या मागील सामाजिक परिवर्तनाची माहिती वैशाली मॅडम यांनी दिली. रमण विज्ञान केंद्र येथे विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स, विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित दालने पाहिली. विज्ञान शिक्षिका रसिका जयस्वाल व मंजुश्री लव्हाळे यांनी माहिती दिली.महाराज बाग प्राणी संग्रहालयात वाघ, चित्ते, अस्वल ,हरिण, पाणमांजर असे नानाविध प्राणी, पक्षी व वन्यजीव , मासे प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली.विद्यार्थ्यांना जयश्री नवलकार व किरण राठोड यांनी माहिती दिली.श्री महालक्ष्मी मंदिर, कोराडीचे दर्शन घेतले. यानंतर सहल कोराडी येथील प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर येथे पोहोचली. विद्यार्थ्यांनी देवी महालक्ष्मीचे श्रद्धेने दर्शन घेतले. रामायण सेंटर, नागपूर शेवटचा टप्पा होता. आनंद वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक माधव मुनशी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपमुख्याध्यापक उदय हातवळणे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. सहलीसाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे तसेच सहकार्य करणाऱ्या पालकांचे पर्यवेक्षिका अलका मुंढे यांनी आभार मानले. नियोजनासाठी ऋचा घोंगे, भारती पवार, राहुल मुदगल यांचे सहकार्य लाभले.

## श्रीकृष्ण राऊत यांची 'मृत्यू समोर दिसता' ही गझल मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** ख्यातनाम गझलकार श्रीकृष्ण राऊत यांची ' मृत्यू समोर दिसता ' ही गझल डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २०२५ ह्या शैक्षणिक सत्रापासून सत्र ४ च्या मराठीसाठी नेमलेल्या ' साहित्यवैभव भाग -४' ह्या पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहे. ह्या पूर्वी २०२३ ला त्यांची 'उभी जिंदगानी ' ही गझल बी. ए. भाग २ च्या अभ्यासक्रमात आणि २०१७ ला त्यांची 'दिंडी ' ही गझल सं. गा. बा. अमरावती विद्यापीठाच्या बी.एस्स.सी भाग १च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली होती.२०१३ ला श्रीकृष्ण राऊत यांची 'एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर' ही कविता रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी. एस्सी. भाग १ च्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली होती. २०१२ ला ११ वी च्या अभ्यासक्रमात त्यांची 'वीज' ही गझल लागली. आणि त्याचवर्षी सं.गा.बा अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग २ च्या अभ्यासक्रमात त्यांची 'मुकुट' ही कविता अभ्यासक्रमात अंतर्भूत झाली. २००१ ते २०१२ या काळात सं.गा.बा. अमरावती विद्यापीठाच्या बी. ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमात त्यांची 'जो जो रे बाळा' ही कविता अभ्यासक्रमात नेमलेली होती. एक नामवंत कवी, गझलकार म्हणून श्रीकृष्ण राऊत यांची महाराष्ट्रभर



ख्याती आहे. 'एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर जन्म घेणाऱ्या तान्ह्या मुला', 'गुलाल आणि इतर गझला', ' कारुण्य माणसाला संतत्व दान देते ,'तुको बादशहा', 'मेळघाटच्या कविता ' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'गझलाई ' ह्या समीक्षा ग्रंथानंतर 'गझलेचे उपयोजित छंदः शास्त्र ' ह्या त्यांच्या बहुचर्चित ग्रंथाची दुसरी आवृत्ती लवकरच प्रकाशित होईल.अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांना गौरविले आहे.'माझी गझल मराठी' ह्या त्यांच्या ब्लॉगची इंटरनेटवर १,६२,००० हून अधिक पृष्ठे जगभर वाचली गेली आहेत.त्यांना साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती मिळाली आहे.अनेक नामवंत गायकांनी त्यांच्या रचनांना आवाज दिला आहे.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना विधान परिषदेत सदस्यता द्या

♦ माऊली फाउंडेशनचे राज्यपालांना निवेदन

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** राज्यात प्रत्येक जिल्हयात राज्यस्तरावरील व जिल्हास्तरावर शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी किमान ९-१० हजार आहेत. तर राज्यात तीन लाख आहेत.

सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे निवृत्तातून विधान परिषदेत सदस्यत्व मिळावे अशी मागणी माऊली फाऊंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडेकर, संचालक मंगेश लांडे, अजय बांडी यांनी राज्यपालांकडे निवेदन दिले आहे.

सेवानिवृत्ती नंतरचा प्रथम पीपीओ हा सेवानिवृत्तीच्या नंतरच्या महिन्यात प्राप्त होणे क्रमप्राप्त असतानाही तो प्राप्त होण्यास संबंधीत विभागाकडून २-३ महिने लागतात. (काही प्रकरणात एक वर्षाचा कालावधी लागलेला आहे) पीपीओ प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये लाभ मिळण्यासाठी पुर्तता करण्याच्या बाबी करीता अनेक महिण्याची प्रतिक्षा करावी लागते. व अन्य अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सेवानिवृत्ती नंतर सेवाकाळातील धावपळ कर्मचाऱ्याची कमी न होता ती उतारवयात ही वाढत राहत आहे. या व अशा अनेक प्रकारच्या समस्यांची पुर्तता राज्यस्तरावरून निकाली व्हाव्यात यास्तव आपल्या कोठयातून सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी यांच्या करीता विधान परिषद मध्ये विभाग निहाय मतदार संघाची निर्मिती व्हावी यास्तव माऊली फाउन्डेशनतर्फे निवेदन दिले.

## निधन वार्ता

### देवकाबाई मेश्राम

**तेल्हारा :** सुपीनाथ नगर मधील



रहिवासी अरुण मेश्राम यांच्या मातोश्री देवकाबाई शहादेव मेश्राम (७०) यांचे १९ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंड असा मोठा आप्तपरिवार आहे.

### मंगला कुळकर्णी

**अकोला :** गोडबोले प्लॉट,



गणराज अपार्टमेंट येथील रहिवासी तथा ज्येष्ठ स्वयंसेवक तात्या कुळकर्णी यांच्या पत्नी मंगला वसंतराव कुळकर्णी (६३) यांचे मंगळवार, २३ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, वैभव, भूषण ही २ मुले व मोठा आप्तपरिवार आहे.

## शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** २१ डिसेंबर रोजी दत्तक ग्राम सांगळूद येथे शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता झाली. सांगळूद येथे या समारोपिय सोहळ्याला शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव गोपाल खंडेलवाल हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले तसेच या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. जगदीश साबू, तसेच सामाजिक कार्यकर्ते छावा संघटनेचे श्री रंजीत भाऊ काळे होते. या यावेळेस मंचावर शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष आणि सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतशील शेतकरी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा अदिती मानकर यांनी केले तर सात दिवसाच्या शिबिराच अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र रेवासकर यांनी केले. आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ निशा वराडे यांनी केले. यावेळेस पुष्पक काळे, श्रुती थोरात, कोमल महाले महल्ले, आनंद लाहोळे या विद्यार्थ्यांनी शिबिरा बाबतचे आपले मनोगत व्यक्त केले.

## दिव्यांगासाठी राखीव ५ टक्के निधी द्या अन्यथा ग्रामपंचायतला कुलूप ठोकू

प्रतिनिधी २४ डिसेंबर




**हातरूण :** लोहारा ग्रामपंचायत अंतर्गत वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, येथील दिव्यांग बांधवानी वारंवार तोंडी आणि लेखी अर्ज करून तसेच निधीची मागणी करून पाच वर्षा पासून ग्रामपंचायत सचिव, सरपंचानी पाच टक्के निधी अद्याप वाटप केले नाही.त्यामुळे गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी बाळापूर यांच्याकडे तक्रार करीत मासिक सभेच्या दिवशी ग्रामपंच्यातला कुलूप ठोकून आंदोलन करण्याचा इशारा दिला. काशिनाथ ढले, रब्बानी देशमुख, आबेद पटेल, निसार देशमुख, सुरेश वानखडे, अरमान पटेल, अमोल बकाल, रहीम देशमुख, अ. नासिर अ. मुजिब, अतिक भाई, आईशा पटेल, शेख अन्वर यांनी निवेदन दिले.

◆ लोहारा ग्रामपंचायतकडून दिव्यांगांना पाच वर्षांपासून पाच टक्के निधी मिळाला नसल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. आपण ग्रामपंचायत अधिका-याला निधी वाटप करण्याचे आदेश दिले आहे.
**गंगाधर गुंडेकर,** विस्तार अधिकारी बाळापूर

◆ आपण नोव्हेंबर महिन्यात लोहारा ग्राम पंचायतचा पदभार स्वीकारला आहे. बॅंक खाते बदल झाल्यानंतर आपण लवकरच दिव्यांग निधीचे वाटप करू.
**एस. एस. भराळे,** प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी लोहारा

## किरकोळ शस्त्रक्रिया पूर्व तपासणी शिबिर

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** जिल्हाधिकारी वर्षा मिना व उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. सुशील वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांच्या नियोजनात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विविध आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून जिल्हा स्त्री रुग्णालयात रविवारी किरकोळ शस्त्रक्रिया पूर्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. असलम तसेच सोलर फ्लेक्स मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. कृष्णकुमार केसान यांच्या मार्गदर्शनाखाली तपासण्या करण्यात आल्या. शिबिरामध्ये जिल्ह्यातील ० ते १८ वर्षे वयोगटातील एकूण ४७ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली.



यापैकी ४० रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान करण्यात आले असून, या सर्व रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व डीईआयसी कार्यक्रमांतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवांचा लाभ जनतेने घ्यावा, असे आवाहन डॉ. आरती कुलवाल, जिल्हा शल्यचिकित्सक यांनी केले आहे.

## सौर ऊर्जा काळाची गरज : जिल्हाधिकारी वर्षा मीना

♦ राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त कार्यशाळा

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला:** जिल्ह्यात सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही काळाची गरज असून पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. त्या राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह निमित्त नियोजन भवन येथे ऊर्जा बचत काळाची गरज ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासनाची धोरणे या विषयावर आधारित कार्यशाळेत बोलत होत्या. यावेळी महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे,ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहंदळे व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर १५० किलोवॅट पारेषण संलग्न सौर विद्युत निर्मिती प्रकल्प सुरू झाल्यामुळे वीजबिलात बचत होत असून ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरता साधण्यासाठी हा महत्वाचा टप्पा ठरत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित आणि उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे. ऊर्जा परीक्षक मेहेंदळे म्हणाले की, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता पारंपरिक ऊर्जास्रोतांवरचा ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहे. सौर ऊर्जेच्या वापरामुळे कार्बन उत्सर्जन कमी होऊन हवामान बदलाच्या समस्येवर नियंत्रण मिळविता येईल.

**NAME CHANGE**

**Mohammad Hanif**
• Name: Mohammad Hanif Sabuddin Rangari
**Sabuddin**
• Father: Sabuddin Shaikh Abdulla Rangari
**Hafiza Bi**
• Mother: Hafiza Bi Sabuddin Rangari
**Nazema Begum**
• Wife: Nazema Begum Mohammad Hanif Rangari
• Passport No: J8891975
**Nazema Begum**
• Name: Nazema Begum Mohammad Hanif Rangari
**Vazeeroddin**
• Father: Vazeeroddin Jamaloddin
**Hajra Bi**
• Mother: Hajra Bi Vazeeroddin
**Mohammad Hanif**
• HuWand: Mohammad Hanif Sabuddin Rangari
• Passport No: J8891974
**Address Details**
**Anjuman School Road, Rangari Kirana, Balapur.**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५

# आसेगाव देवी येथे श्रमदानाने बांधला वनराई बंधारा

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**यवतमाळ** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत बाभूळगाव तालुक्यातील आसेगाव देवी गावाने एक उत्तम उदाहरण घालून दिले आहे. गावकऱ्यांच्या एकत्रित श्रमदानातून यावली रोडवरील नाल्यावर वनराई बंधारा बांधण्यात आला. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या तत्त्वाला प्रत्यक्षात आणणारा हा उपक्रम गावातील भूजल पातळी वाढवण्यासाठी आणि पाणीटंचाई कमी करण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे.

ग्रामपंचायतीने यापूर्वीही अनेक ठिकाणी असे बंधारे बांधले असून, या अभियानांतर्गत जलसंधारणाला प्राधान्य दिले जात आहे. या कामात बाभूळगाव गटविकास अधिकारी ढोले, विस्तार अधिकारी हेडाऊ, लांजेकर, दत्तात्रय तंबलवाड, सरपंच सचिन चव्हाण, ओंकेश कावलकर, सुभाष ताबडू, गडपायले, जिल्हा परिषदेचे शिक्षक राऊत, विद्यार्थी, आशा सेविका, कृषी सहायक, दातारकर, कृषी सखी आणि ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# महिलांच्या सुरक्षेसाठी 'दामिनी-निर्भया' पथक तयार करा

## नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षिततेसाठी नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी आज एक ठोस पाऊल उचलले आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून निवेदन दिले. यवतमाळ शहरासाठी स्वतंत्र दामिनी, निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी केली आहे.

नगराध्यक्षांनी पत्रात स्पष्ट केले की, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, शाळा-कॉलेज परिसर, बसस्थानके आणि गर्दीच्या भागांत महिलांवरील छेडछाड, गैरवर्तन यांसारख्या घटना रोखण्यासाठी विशेष महिला पोलिस पथकाची गरज आहे. हे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचून प्रतिबंधात्मक कारवाई करू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

प्रियदर्शनी उईके (भाजपा) यांनी नुकतेच यवतमाळ नगर परिषद निवडणुकीत १३,७१९ मतांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवून नगराध्यक्षपद पटकावले आहे. त्यांच्या या मागणीमुळे शहरातील महिलांसाठी एक मोठी आशा निर्माण झाली आहे.

महिला पोलिसांची तत्परता आणि जनजागृती दामिनी पथकाच्या माध्यमातून महिलांना निर्भय वाटावे, असा प्रयत्न राज्यात मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर यांसारख्या शहरांत दामिनी/निर्भया पथक यशस्वीपणे कार्यरत आहे. यवतमाळसाठीही असे पथक लवकरच येऊ शकते, अशी शक्यता आहे. राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षिततेसाठी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे, त्यामुळे ही मागणी लवकर पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.



# गोठ्याला शॉर्ट सर्किटने आग

## खत-युरिया जळून खाक; लाखोचे नुकसान

प्रतिनिधी २४ डिसेंबर





**पांढरकवडा** : केळापूर तालुक्यातील गणेशपुर (वाई) येथे शेतातील गोठ्याला शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत गोठ्यात ठेवलेले खत, युरिया आणि शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आगीची घटना उघडकीस आल्यानंतर स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी तात्काळ ग्रामपंचायतीकडे तक्रार दाखल केली. पंचनामा पूर्ण करण्यात आला असून, झालेल्या नुकसानाची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पीडित शेतकऱ्यांमध्ये अमरनाथ भगत, जसविंदरसिंग हरिसिंग शोखी यांचा समावेश आहे. कृषी उत्पन्न समितीचे माजी सभापती बिसनसिंग शिंदे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, ''शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने तात्काळ मदत करावी.'' ग्रामस्थांनी सरकारकडे त्वरित नुकसानभरपाईची मागणी केली असून, या प्रकरणी प्रशासनाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे.

# 'स्वप्नांची तीन चाके' : 'अक्षय'च्या जीवनात सायकल घडवू शकते क्रांती

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**ढाणकी** : जन्मापासून दोन्ही पाय पोलिओने ग्रस्त असलेल्या २० वर्षीय अक्षय हापसेसाठी एक तीन चाकी सायकल ही फक्त वाहन नाही, तर स्वावलंबनाची, स्वाभिमानाची आणि नव्या जीवनाची किल्ली आहे. मात्र अत्यंत दारिद्र्याच्या साखळीत अडकलेल्या या कुटुंबासाठी ती सायकल आजही 'स्वप्न'च आहे. आई-वडील म्हातारे, आई अपंग, माती-कुडाचे घर आणि आश्वासनांचा भ्रम... या पार्श्वभूमीवर अक्षयच्या डोळ्यातील आशा अजूनही तेवत आहे.



अक्षयच्या आईला काही वर्षांपूर्वी मुलाला आंघोळ घालताना पाय घसरला आणि हाड मोडले. आर्थिक परिस्थितीमुळे फक्त मलम-पट्टीच शक्य झाली. आज ती कायमची अपंग झाली आहे. वडील शेळीपालनाने आणि आई मिळेल त्या मजुरीने कसेबसे संसार चालवतात. घरकुल योजनेचाही लाभ मिळालेला नाही. अनेक नेत्यांनी दिलेली मदतीची आश्वासने शब्दांपुरतीच राहिली.

अक्षय म्हणतो, "मला ही तीन चाकी सायकल मिळाली तर मी घराबाहेर पडू शकेन, स्वतःच्या हाताने काही काम करू शकेन आणि आई-वडिलांना आधार देऊ शकेन. मीही समाजाचा एक भाग होऊ शकेन."

शासनाच्या अपंग कल्याण योजनांपासूनही निरक्षरता आणि आर्थिक कमकुवतपणामुळे हापसे कुटुंब वंचित राहिले आहे. खालील छायाचित्रांमधून अक्षयसारख्या असंख्य तरुणांच्या व्यथेची झलक दिसते. एक छोटी मदत त्यांच्या जीवनात मोठा बदल घडवू शकते.

आईच्या अपंगत्वाने कुटुंबावर आणखी ओझे... गरीबी आणि अपंगत्वाच्या या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि जागरूक नागरिकांनी पुढे येण्याची ही खरी वेळ आहे. एक छोटी मदत... एक मोठे स्वप्न पूर्ण करू शकते! मदतीसाठी ढाणकी परिसरातील स्थानिकांशी किंवा थेट हापसे कुटुंबाशी संपर्क साधावा. अक्षयच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी आपला हात पुढे करा!

# माणुसकीच्या सेवेतून संत गाडगेबाबांच्या विचारांना अभिवादन

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**पुसद** : कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद यांच्या वतीने निंबी येथील संत गाडगेबाबा स्मृतीस्थळ (जाधव बाग) येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करून संत गाडगेबाबांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशनचे सदस्य गेल्या दहा वर्षांपासून संत गाडगेबाबांनी दिलेल्या दशसूत्रीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजसेवेचे कार्य करीत आहेत. भुकेल्यांना अन्नदान, निर्वस्त्रांना कपडे, निराधारांना आर्थिक मदत, गरजवंतांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहाय्य, बेघर मनोरुग्णांना उपचार व आसरा, आजारग्रस्तांना वैद्यकीय मदत तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये घर जळालेल्या कुटुंबांना मदतीचा हात अशा अनेक समाजहिताच्या उपक्रमांतून फाउंडेशन माणुसकीचा दीप प्रज्वलित करीत आहे.

या पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या मूर्तीपूजनाने झाली. सप्तखंजिरी वादक पंकजपाल महाराज, गुरुदेव सेवा मंडळ पुसदचे अध्यक्ष प्रकाश लामने, शेतीनिष्ठ शेतकरी दत्तात्रय जाधव, मिशन ग्रीनचे अध्यक्ष रमेश डंबोळे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त यशवंत देशमुख, गुरुदेव मंडळाचे नंदकुमार खैरे, गजानन कवाने, माणुसकीची भिंतचे मार्गदर्शक मारोती भस्मे, गीताई सेवा केंद्रच्या शैलाताई सावंत आदी मान्यवरांच्या हस्ते हे पूजन पार पडले.

यावेळी उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आपल्या ओजस्वी भाषणातून संत गाडगेबाबांच्या स्वच्छता, श्रम, समता आणि मानवसेवेच्या विचारांचे महत्त्व विशद केले. माणुसकी हीच खरी देवपूजा आहे," हा संत गाडगेबाबांचा संदेश आजही समाजाला दिशा देणारा आहे, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

यानंतर उपजिल्हा रुग्णालय, पुसद येथील माणुसकीची भिंत मदत केंद्रामध्ये रुग्ण व गरजूंना अन्नदान, फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. तसेच संत गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार व्हावा यासाठी त्यांची पुस्तकेही वाटप करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिशन ग्रीनचे उपाध्यक्ष पवन बोजेवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन पंकजपाल महाराज यांनी केले. याप्रसंगी गोपाळराव देशमुख, नयनकुमार रामधनी, माणुसकीची भिंत अध्यक्ष गजानन जाधव, अनंता चतुर, पंजाब ढेकळे, शिवराम शेट्टे, दिगंबर देशमुख, गणेश सावंत, मंगेश भगत, धनंजय आघाम, प्रमोद ठाकूर, दादाराव पाईकराव, अरुण नागुलकर, वसंत जाधव, मधुकर चव्हाण, बाबासाहेब मुळे, दिगंबर जयस्वाल, गोपाल देशमुख, संतोष आंभोरे, बाबाराव आंभोरे, दत्ताभाऊ मस्के, बाळू पैठणकर, बेबी राऊत, मोनिका जाधव, आदित्य जाधव, क्रिश आगलावे, रितिका आगलावे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोदावरी अर्बनला 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार' प्रदान

प्रतिनिधी २४ डिसेंबर




**यवतमाळ** : जागतिक सहकार वर्ष २०२५ निमित्त ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित सहकार संमेलनात गोदावरी अर्बन नागरी सहकारी पतसंस्थेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा प्रतिष्ठित पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाळासाहेब पाटील, राज्य सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनास्कर तसेच कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी गोदावरी अर्बनचे सचिव ॲड. रविंद्र रगटे, उपसरव्यवस्थापक रवि इंगळे, विजय शिरमेवार, वरिष्ठ मार्केटिंग अधिकारी महेश केंद्रे तसेच पुणे शाखेचे व्यवस्थापक अंकुश बिबेकर यांनी पुरस्कार स्वीकारला.

कार्यक्रमात सहकार मंत्री नामदार बाळासाहेब पाटील यांनी गोदावरी अर्बनच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक करत, संस्थेने सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण केल्याचे गौरवोद्गार काढले. सहकार क्षेत्रातील पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन प्रणाली, सभासदाभिमुख सेवा व सातत्यपूर्ण प्रगती या बाबींची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील तसेच अध्यक्ष राजश्री पाटील यांनी गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, समस्त संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वृंद तसेच सर्व सभासद व ठेवीदारांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

हे यश संघभावना, प्रामाणिक कार्यपद्धती आणि सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.

## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार शंकरराव अजबराव देशमुख रा डोगरगाव ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता वैष्णवी शंकर देशमुख जन्म/सचिव. ग्रा. पचायत डोगरगाव ता. महागांव येथे दि. 17/07/2008 ोजी झाला आहे,

परंतु त्यांच्या जन्म नोंद. सचिव. ग्रा.पचायत डोगरगाव नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) ग्रा.प. डोगरगाव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक 24/12/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

## जाहीरनामा

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार गजानन गुलाबराव पुंडे रा.वेणी बु.तालुका महागाव यांचे स्वतः करीता नामे गजानन गुलाबराव पुंडे यांचा जन्म दिनांक 14/06/1974 रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत वेणी बु.तालुका महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार ग्रामपंचायत वेणी बु. येथे घेण्याकरिता महागाव तहसील कार्यालयात जन्माची नोंद आदेशित घेण्याबाबत प्रकरण तहसील कार्यालय सादर केले आहे.

या जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले अक्षेप लेखी कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची आक्षेप घेणाऱ्यांनी नोंद घ्यावी

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

## जाहीरनामा

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार अविनाश कैलास पुंडे रा.वेणी बु.तालुका महागाव यांचे स्वतः करीता नामे अविनाश कैलास पुंडे जन्म दिनांक 10/06/1992रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत वेणी बु.तालुका महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार ग्रामपंचायत वेणी बु. येथे घेण्याकरिता महागाव तहसील कार्यालयात जन्माची नोंद आदेशित घेण्याबाबत प्रकरण तहसील कार्यालय सादर केले आहे.

या जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले अक्षेप लेखी कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची आक्षेप घेणाऱ्यांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

## जाहीरनामा

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार उमाकांत कैलास पुंडे रा.वेणी बु.तालुका महागाव यांचे स्वतः करीता नामे उमाकांत कैलास पुंडे जन्म दिनांक 22/04/1995 रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत वेणी बु.तालुका महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार ग्रामपंचायत वेणी बु. येथे घेण्याकरिता महागाव तहसील कार्यालयात जन्माची नोंद आदेशित घेण्याबाबत प्रकरण तहसील कार्यालय सादर केले आहे.

या जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले अक्षेप लेखी कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची आक्षेप घेणाऱ्यांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

## जाहीरनामा

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की अर्जदार कैलास गुलाबराव पुंडे रा.वेणी बु.तालुका महागाव यांचे स्वतः करीता नामे कैलास गुलाबराव पुंडे यांचा जन्म दिनांक 05/01/1965 रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्माची नोंद सचिव ग्रामपंचायत वेणी बु.तालुका महागाव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13,3 नुसार ग्रामपंचायत वेणी बु. येथे घेण्याकरिता महागाव तहसील कार्यालयात जन्माची नोंद आदेशित घेण्याबाबत प्रकरण तहसील कार्यालय सादर केले आहे.

या जाहीरनामा बाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले अक्षेप लेखी कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या अक्षेपाचा कोणताही विचार केला जाणार नाही याची आक्षेप घेणाऱ्यांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा./-**
**तहसिलदार, महागांव**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com







# शिक्षण विभागाच्या भ्रष्टाचारासाठी मात्र, एसआयटीच्या चौकशीचे सत्र, धडकणार कारवाईचे पत्र!

## आजपासून विभागीय चौकशी सुरू

## दिड लाख शिक्षकांचा पगार थांबणार *कारवाईची प्रक्रिया लांबणार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शिक्षण विभागाच्या भरती घोटाळ्याचा शुभारंभ वाशीम जिल्ह्यातूनच झाला. २५ वर्षापासून बोगस शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बॅकडेटमध्ये थेट भरती करण्यात आली. भरती घोटाळ्याचे २०१४ मध्ये वृत्त मालिकेतून सिटी न्युज सुरपफास्टने प्रकरण उघडकीस आणले. त्यानंतर २ शिक्षण अधिकाऱ्यांना निलंबीत करून अनेक शाळांवर गुन्हे दाखल करण्यात आले. आता पवित्र पोर्टल वरून न्यायालयाने शिक्षण विभागाला खडे बोल सुनावले आहे. पवित्र पोर्टल हे संस्था चालकांनी अपवित्र ठरवून शिक्षण विभागातही भ्रष्टाचाराचे वेगळे चित्र निर्माण झाले आहे. वाशीम जिल्ह्यात भरती घोटाळातर विचित्र आहे.सरस्वतींच्या कार्यालयात लक्ष्मीदर्शनाशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे. न्यायालयाच्या आदेशाने शिक्षण विभागाला आता पोर्टल वरून ताशेरे ओढल्या जात आहे. आजपासून बोगस शिक्षक भरती शालार्थ आयडी प्रकरणाची एसआयटी चौकशी होणार आहे. या चौकशीत २५ वर्षाचा घोटाळ्याचा कारनामा बाहेर येणार आहे.

* बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी प्रकरण, शिक्षण विभागाचे भ्रष्टधोरण, गरीबांचे मरण
* आज २४ डिसेंबर रोजी अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात एसआयटी चौकशी होणार
* तक्रारकर्ते, तत्कालीन व विद्यमान शिक्षणाधिकारी, संस्था अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक हजर राहणार
* एसआयटी चौकशी अधिकाऱ्यांनी पारदर्शक चौकशी केल्यास शिक्षण क्षेत्रातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस येणार




### घोटाळा पुन्हा पुन्हा, दाखल होणार गुन्हा...

शालेय शिक्षण विभागातील शालार्थ आयडी घोटाळ्यात नागपूर विभागात दाखल गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाला आता राज्यभरातील गुन्ह्यांची चौकशी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. नागपूर शहरातील पोलिस उपायुक्त नित्यानंद झा हे या एसआयटीचे प्रमुख आहेत. शालार्थ घोटाळ्यात जिथे जिथे राज्यात गुन्हे दाखल झालेले आहेत तिथे तिथे चौकशी करण्याचे काम आता ही एसआयटी करेल. विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) मनोज शर्मा यांनी अलिकडेच या संबंधीचा आदेश काढला आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी चाळीसगाव (जि. जळगाव) येथे तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिस त्याची चौकशी करत आहेत. मात्र, नागपुरातील घोटाळ्यांची चौकशी करण्यासाठी तेथील पोलिस आयुक्तांनी नित्यानंद झा यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमलेली होती. शालार्थ घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असल्याचे दिसून आले आहे. या पार्श्वभूमीवर अशा सगळया गुन्ह्यांचा एकत्रितपणे आणि अधिक सुलभपणे तपास व्हावा यासाठी नित्यानंद झा प्रमुख असलेल्या एसआयटीला राज्यभरातील गुन्ह्यांचा तपास करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.आता आजपासून वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या घोटाळ्याची विभागीय चौकशी सुरू झाली आहे.

### शिक्षक होणार गार, बंद होणार पगार...

जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाला भ्रष्टाचाराने पोखरून वाळवी लावली आहे. बॅकडेट बोगस भरती, समायोजन बोगस भरती, शाळा वाटपात नाही पाहिले अंतर, भ्रष्टाचार निरंतर, शालार्थ आयडी घोटाळा, टिईटी घोटाळा अशा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गंभीर तक्रारी आल्याने आता चौकशीची प्रक्रिया सुरु झाली आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने ९ सप्टेंबर रोजी पुणे येथील शिक्षण आयुक्तांना पत्र पाठवून या प्रकरणात तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता चौकशीचे सत्र सुरु झाले असून कारवाईचे पत्र धडकल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

### भरती घोटाळ्याचा २०१४ पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...

#### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत, अनेक शाळांवर गुन्हे दाखल

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती.तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले.नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे, तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे.या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.

शिक्षण विभागातील बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी प्रकरणाच्या एसआयटी चौकशीला प्रारंभ आज २४ डिसेंबर रोजी अमरावती येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयात एसआयटी चौकशी होणार आहे. तक्रारकर्ते, तत्कालीन व विद्यमान शिक्षणाधिकारी, संस्था अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक या चौकशीला हजर राहणार असून अमरावती विभागाचे शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व शिक्षण उपसंचालक यांची भूमिका संशयास्पद एसआयटी चौकशी अधिकाऱ्यांनी पारदर्शक चौकशी केल्यास शिक्षण क्षेत्रातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस येणार आहे. वाशीम जिल्ह्यात माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी भरती झाल्याबाबत सिटी न्यूज सुपरफास्ट ने वृत्तमालिका प्रकाशित केला आहे.तसेच शिक्षण विभागातील मोठ्या घोटाळ्याची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी पण सिटी न्युज सुपरफास्ट ने केली होती.अखेर शासनाने शिक्षण विभागातील बोगस पददभरती व बोगस शालार्थ आयडी प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आज २४ डिसेंबर रोजी अमरावती येथील विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात दुपारी १२.३० वाजता तक्रारकर्ते नागरिक आणि संबंधित संस्थेचे आजी-माजी अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक यांना सविस्तर चौकशीस हजर राहण्याचे आदेश दिल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या एसआयटी चौकशीने शिक्षण क्षेत्रातील अनेकांची त्रेधातिरपट होणार आहे.चौकशी अधिकाऱ्यांनी ही चौकशी अतिशय पारदर्शकपणे करुन सर्व भ्रष्टांवर कडक फौजदारी कारवाई करण्याची मागणी शिक्षण क्षेत्रातील प्रामाणिक लोकांकडून केल्या जात आहे.

**शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि शिक्षण उपसंचालक यांचे कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालकांसह शिक्षण मंडळाचे आजी-माजी अध्यक्ष सुद्धा शालार्थ आयडी घोटाळ्यासह बोगस पदभरती प्रकरणात सहभागी असून त्यांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात अपसंपदा गोळा केल्याची शिक्षण विभागात चर्चा आहे.अशा भ्रष्ट अधिकाऱ्याना या पारदर्शक चौकशी मध्ये एसआयटी ने लांबच ठेवून या महाघोटाळ्याची सखोल चौकशी करून सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी कारवाइ करावी अशी मागणी शिक्षणप्रेमी जनतेकडून होत आहे.




## थोडक्यात

### मंगरूळपीर-दाभडी बस सेवा पूर्ववत चालू करा;विद्यार्थ्यांची हेळसांड थांबवा



●सिटी न्यूज ब्यूरो @ वाशीम●

मंगरूळपीर ते दाभडी बस सेवा अनेक महिन्यापासून रस्त्याचे काम चालू असल्यामुळे बंद होते ते काम जेमतेम होत आले असून बस सेवा चालू केली तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्या करिता मंगरूळपीर ते दाभडी बंद असलेली एस.टी. बस सेवा सुरू झाल्यास सनगाव भडकुंभा रामगड दाभडी येथील विद्यार्थी फाळेगाव (व्यवहारे ) धानोरा (खुर्द ) मंगरूळपीर व इतर ठिकाणी शिक्षणा साठी जात असतात परंतु बस सेवा नसल्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्याकरिता मंगरूळपीर दाभडी बस सेवा पूर्ववत चालू करावी या करिता अगर प्रमुख मंगरूळपीर यांना निवेदन दिले असून सदर निवेदन द्वारे

शितल विष्णू राठोड, महिला जिल्हा अध्यक्ष, समनक जनता पार्टी, वाशिम. यांनी मागणी केली आह मागील ६ महिन्यां पासून मंगरूळपीर आगाराची बस बंद असल्याने येथील सुमारे चारशे ते पाचशे विद्यार्थी यांना विनाकारण खाजगी वाहनाने यावे लागते व विद्यार्थ्यांना जास्तीचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे सदर एस.टी. सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्यामुळे तात्काळ बस सेवा चालू करावी अन्यथा समनक जनता पार्टी, च्या वतीने मंगरूळपीर डेपो कार्यालया समोर विद्यार्थी व पालकासह तीव्र आंदोलन छेडल्या जाईल याची दखल प्रशासनाने घ्यावी असेही निवेदनात नमूद केले आहे.

## पोखराला पोखरले भ्रष्टाचाराने घेरले...

# पोखरा योजनेत गैरप्रकार, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार!

## *कारवाईसाठी मात्र, चौकशीचे सुरू झाले सत्र, जिल्हाधिकाऱ्यानी दिले पत्र

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात सन २०१९ ते २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ( पोखरा ) भाग - १ या योजनेत लाखों रुपयांचा गैरप्रकार झाला असल्याची ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वाशिम यांनी तात्काळ दखल घेऊन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना एका पत्रान्वे सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सबंधित अधिकाऱ्यांना सदर तक्रारीतील मुद्द्यांची सखोल चौकशी करून आठ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत रामराव खडसे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार दाखल केली आहे. तद्वतच सदर तक्रारीच्या प्रतिलिपी राज्याचे प्रधान सचिव मुंबई, कृषी संचालक पुणे, सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम आदी प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर गंभीर तक्रारीची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम यांच्याकडे सदर चौकशीची जबाबदारी दिली आहे.

सदर तक्रारीत तक्रारदार यांनी म्हटले आहे की, पोकरा योजने अंतर्गत शेलुखडसे येथील शेतकरी ज्ञानेश्वर गजानन खडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून शासनाची फसवणूक केली आहे. विशेष करून शेतकऱ्यांसाठी सदर योजना एक वरदान ठरणारी आहे. मात्र काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थापाई योजनाच पोखरून टाकली आहे. एकीकडे विविध निकष लावून आणि त्रुटी काढून खऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवले. तर दुसरीकडे एकाच कुटुंबात लाखों रुपयांचा लाभ दिला आहे. त्याच धर्तीवर शेलुखडसे येथील ज्ञानेश्वर खडसे याने स्वतःच्या नावावर व वडील, भाऊ आणि आई यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान लाटले आहे. तर त्यात एकाच नावावर अनेक घटकांचा डबल लाभ घेतला आहे. विशेष बाब म्हणजे गट क्रमांक ६३३ मध्ये वडिलोपार्जित जुनी विहीर असताना आईच्या नावावर पोकरा योजनेतून गैरप्रकारे नवी



विहीर घेतली आहे. तर ही नवी विहीर खोदण्याआधीच आई व वडिलांच्या नावावर गट क्रमांक ६३३ मध्ये कुठलेही फळझाड न लावता फळबाग लागवडीच्या नावाखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले आहे. इतकेच नव्हे; तर या महाशयाने शेलुखडसे येथील त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ६०२ ला लागून असलेल्या ग्राम पंचायत गावठाण हद्दीत अतिक्रमण करून सरकारी जागेत विहीर खोदली आहे. आणि गैरप्रकाराचा महाप्रताप म्हणजे सदर अतिक्रमित विहीर खाजगी सात बारावर नोंद करून घेतली आहे. आणि त्याच विहीरीच्या भरवशावर पोकरा योजनेतून १५ ते १६ लाख रुपयांचे नेटशेड घेतले आहे. पाईप लाईन, आणि महाडीबीटी मधून कृषीच्या अनेक योजनांचा गैरप्रकारे लाभ घेतला आहे. याबाबत तक्रारदार वसंत खडसे यांनी जिल्हाधिकारी वाशिम, उपविभागीय अधिकारी वाशिम आणि तहसीलदार रिसोड यांना निवेदनाद्वारे तक्रार दिली होती. मात्र सदर प्रकरणात कोणीही दखल न घेतल्यामुळे आपण थेट राज्याचे मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव व ईतर वरिष्ठ स्तरांवर तक्रार दाखल केली असून, सदर गंभीर गैरप्रकाराची सखोल चौकशी करावी व संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे पत्र जाक्र/जिअकृअ/तांशा/नादेकृसंप्र / ४८१५/ २०२५ दि.११ डिसेंबर २०२५ व ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार नुसार तंत्र अधिकारी अनिल राठोड यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर कारवाई ८ दिवसाच्या आत करण्यात यावी जेणेकरून वरिष्ठ कार्यालयास चौकशी अहवाल विहीत वेळेत सादर करता येईल असे नमुद करण्यात आले आहे.

> या आधी जालना, संभाजी नगर, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात तक्रारीवरून तपासणी व चौकशी केली असता शेडनेट अनुदान, गोदामे, शेतमाल संकलन केंद्र, औजारे बँक इत्यादींच्या अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे सिद्ध झाले आहे. सदर चौकशी समितीने केलेल्या तपासणीत ५६ लाख गैरप्रकार आढळून आले होते. त्याच धर्तीवर आपण ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार केली आहे. माझ्या गंभीर तक्रारीची सखोल व पारदर्शक चौकशी होईल अशी अपेक्षा आहे .
>
> **वसंत रामराव खडसे ( तक्रारदार शेतकरी, शेलुखडसे )**

### वस्तुस्थितीची योग्य तपासणी झाल्यास मोठे घबाड समोर येणार...

रिसोड तालुक्यातील पोकरा भाग एक मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावात हीच बोंब असल्याची चर्चा जोर धरत आहे. अनेक गावातील पात्र लाभार्थ्यांना डावलून ठराविक दामाजीपंतांनाच बोगस लाभ दिला असल्याचे पुरावे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर शेलुखडसे येथील गंभीर तक्रारीची योग्य तपासणी करून पारदर्शक चौकशी केल्यास मोठे घबाड समोर येणार असल्याचे बोलले जात आहे.

शिवाय यातील दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून योग्य ती कारवाई केली तर, नुकत्याच सुरू झालेल्या पोखरा भाग दोन तरी सुरळीत पार पडेल. आणि खऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ मिळेल असे सुध्दा सुज्ञ लोक बोलत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष विरोधात अडीच वर्ष नाही येणार अविश्वास प्रस्ताव

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** जिल्ह्यातील पांच नगर परिषद निवडणुकीत चार नगरपालिकांमध्ये भाजपाचे उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. तर एका नगरपालिकेत काँग्रेसच्या महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. तर एका नगरपंचायत मध्ये वंचित बहुजन आघाडी चा उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून आला आहे. बाळापुर नगरपालिकेत काँग्रेसच्या उमेदवार आफरीन परवीन यांनी एडवोकेट खतीब घराण्याची सत्ता मोडून काढीत बाळापुर नगरपालिकेवर काँग्रेसचा झेंडा फडकवला आहे. बाळापुर नगरपालिकेत काँग्रेसचे नऊ सदस्य नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. तर दुसरीकडे बार्शीटाकळी मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार अख्तर खातून अलीमुद्दीन भाजपाच्या उमेदवाराचा पराभव करीत मोठ्या मताने निवडून आल्या आहेत, पक्षीय बलाबल पाहता या दोन्ही नगरपालिकांमध्ये नगराध्यक्षांना हटविण्यासाठी अन्य पक्ष अविश्वास प्रस्ताव आणू शकतात अशी लोकांना भीती आहे. परंतु राज्य सरकारच्या आदेशात स्पष्टपणे म्हटले आहे की सार्वजनिक रित्या निवडून आलेल्या नगराध्यक्षांवर अडीच वर्षासाठी अविश्वास प्रस्ताव आणता येणार नाही. त्यामुळे नवीन नगराध्यक्षांना संधी मिळेल. अविश्वास प्रस्ताव प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेवर ठेवण्यासाठी प्रशासनाला निर्धारित वेळेत कारवाई करावी लागेल. या नवीन प्रणालीमुळे नगरपरिषदांमध्ये वारंवार होणारे सत्ता बदल रोखले जातील आणि नगराध्यक्षांना विकास कामासाठी पुरेसा वेळ मिळेल. तसेच याचा संबंधित शहराच्या विकासावर परिणाम होणार नाही. आणि चेकमेटच्या खेळाद्वारे बहुमत मिळवणाऱ्या पक्षाच्या गुंडगिरीलाही आळा बसणार आहे. या नवीन प्रणालीमुळे नगरपरिषदांमध्ये वारंवार होणारे सत्ताबदल रोखले जातील आणि नगराध्यक्षांना विकास कामासाठी पुरेसा वेळ मिळेल, बाळापुरात काँग्रेसचा नगराध्यक्ष आहे, परंतु नगर विकास पार्टीकडे तेवढ्याच सीट आहेत परंतु शासनाचा निर्णय पाहता अडीच वर्ष तरी या सर्व पक्षांना चूप राहणे भाग पडणार आहे. राज्य सरकारने नगरपरिषदा आणि नगरपंचायतच्या नगराध्यक्षाविरुद्ध अविश्वास प्रस्तावा बाबतच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. त्यानुसार नगराध्यक्षांविरुद्ध त्यांच्या कार्य काळाच्या पहिल्या अडीच वर्षात अविश्वास प्रस्ताव आणता येणार नाही. अडीच वर्षे पूर्ण झाल्यानंतरच अविश्वास प्रस्ताव आणता येईल. अविश्वास प्रस्तावाला एकूण निवडून आलेल्या सदस्यांपैकी किमान दोन तृतीयांश नगरसेवकांचा पाठिंबा आवश्यक असतो, जर प्रस्ताव मंजूर झाला तर महापौरांना पदावरून काढून टाकले जाईल. त्यामुळे पुढील अडीच वर्षापर्यंत तरी निवडून आलेल्या या नवीन नगराध्यक्षांना कुठलाही धोका नसल्याचे दिसून येत आहे

# नगरपालिका निवडणुकीप्रमाणे महापालिकेतही दिसणार का एमआयएमचा जोर ?

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने अकोला जिल्ह्यात आपले वर्चस्व कायम ठेवले. तथापि, या निवडणुकीत भाजपला काँग्रेस आणि वंचित यांच्याऐवजी एमआयएम उमेदवारांकडून जोरदार टक्कर मिळाली. हाच फॅक्टर जर आगामी अकोला महानगरपालिका निवडणुकीत कायम राहिल्यास मुस्लिम मतांवर निर्भर अन्य पक्ष्यांची चांगलीच डोकेदुखी वाढणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिकांच्या बहुकोनी लढतीत मतांच्या विभाजनाचा फायदा भारतीय जनता पक्षाला झाला. तथापि, या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित यांच्याऐवजी एमआयएम चा जोर निवडणुकीत दिसून आला. जिल्ह्यात प्रमुख पक्ष निष्प्रभ राहिले असले तरी, एमआयएम घटक आता भाजपचा प्रमुख विरोधक असल्याचे दिसून आले. अकोट शहरात भाजपला एमआयएम उमेदवारांकडून जोरदार टक्कर मिळाली. मूर्तिजापूरमध्येही अशीच टक्कर दिसून आली. एमआयएम आणि अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील मुस्लिम मतांच्या विभाजनाचा थेट भाजपला फायदा झाला. हे नवीन राजकीय समीकरण आगामी महापालिका निवडणुकीत भाजपसाठी डोकेदुखी ठरू शकते. मागील महापालिका निवडणुकीत मुस्लिमबहुल भागातून एमआयएमला लक्षणीय मते मिळाली होती. यावेळीही महापालिकेतही त्यांची ताकद वाढेल. जर हा फॅक्टर निवडणुकीत कायम राहिला तर भाजपला मोठे आव्हान मिळेल. परंतु मुस्लिम मतांवर अवलंबून असलेल्या अन्य राजकीय पक्षांना नुकसान सहन करावे लागू शकते. काही दिवसांपूर्वी विधानसभा निवडणुकीदरम्यान एमआयएमचे असदुद्दीन ओवैसी यांनी शहरात एक सभा घेतली होती. या सभेतील गर्दीमुळे मुस्लिम मतांवर अवलंबून असलेल्या इतर राजकीय पक्षांनी चांगलाच धसका घेतला होता. मुस्लिमबहुल भागात भाजपची जादू चालत नाही, त्यामुळे पक्ष केवळ हिंदुत्वावर अवलंबून आहे. तथापि जर एमआयएम फॅक्टर जर महापालिकेत चालला तर महापालिकेच्या निवडणुकीत मुस्लिम मतांवर अवलंबून असलेल्या अन्य राजकीय पक्षांना मुस्लिम मतांपासून वंचित व्हावे लागेल त्यामुळे या सर्व पक्षांची डोकेदुखी चांगलीच वाढणार आहे

# कर्जापायी शेतकऱ्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोट :** सततची नापिकी तसेच आर्थिक वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले अल्पभूधारक शेतकरी चंद्रशेखर काशिनाथ झापे (४५) यांनी २२ डिसेंबर रोजी स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. शेतकरी चंद्रशेखर झापे हे सकाळी घरून निघून गेल्यानंतर संध्याकाळपर्यंत घरी परत आले नव्हते. त्यामुळे त्यांची शोधाशोध करण्यात आली असता त्यांच्या शेतातील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आला. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याकडे फक्त अडीच एकर शेत असून त्यात संत्र्याची झाडे आहेत. परंतु गेल्या तीन चार वर्षांपासून संत्र्याचे पिक येत नसल्यामुळे ते नेहमी विवंचनेत असायचे. वाढता कर्जाचा डोंगर पाहता त्यअकोली जहागीर शाखेच्या एसबीआय बँकेचे कर्ज कसे फेडावे या विवंचनेत सदर शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केल्याची चर्चा सुरू आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा मोठा आप्तपरिवार आहे.

# तिरुपती-हिसार-तिरुपती एक्सप्रेसला मुदतवाढ

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** अकोला-वाशिम-हिंगोली-पुर्णा मार्गे धावणाऱ्या तिरुपती-हिसार-तिरुपती गाडीला प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करता व गर्दीचा ताण कमी करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वे विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या या विशेष एक्सप्रेस गाड्यांच्या वाहतुकीचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तिरुपती-हिसार-तिरुपती मुदतवाढीनुसार एक्सप्रेसच्या तिरुपती हिसार या गाडीला ३१ डिसेंबर ते ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत एकुण ७ फेऱ्या होणार असून प्रत्येक बुधवारी तिरुपती येथून प्रस्थान करणार आहे. या गाडीची मुदत २४ डिसेंबरपर्यंत होती त्यात वाढ करण्यात आली आहे.

# काँग्रेस आमदाराला वंचितचा शह

◆ प्रभाग ७ आणि ९ चे उमेदवार केले जाहिर

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** काँग्रेस आमदार साजीद खान पठाण ज्या प्रभागातून महापालिकेत आले. त्याच ठिकाणीच वंचितने उमेदवार आज घोषित करत वंचित आणि काँग्रेस सोबत आघाडी होत नसल्याचे चित्र निर्माण केले आहे. वंचित नेते नतिकोद्दीन खतिब यांनी आज प्रभाग ७ आणि ९ चे वंचितचे उमेदवार जाहिर केले. यावेळी त्यांच्या सोबत वंचित शहर अध्यक्ष निलेश देव यांची उपस्थिती होती.

प्रभाग सात अ मध्ये अनुसूचित जाती मध्ये किरण महेंद्र डोंगरे आणि सर्वसाधारण गटात महेंद्र देविदास डोंगरे यांच्या नावाची घोषणा आज वंचितने केली. त्याच बरोबर प्रभाग नऊ मध्ये चंदू शिरसाट, नाज परवीन शेख वसीम, शमिम परवीन कलीम खान पठाण यांच्या नावाची घोषणा आज वंचितने केली आहे. यांना अधिकृत उमेदवारी आज वंचितने जाहिर केली आहे.

# मनसे शहर अध्यक्षपदी आकाश पाटील यांची नियुक्ती

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**खामगाव :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना खामगांव शहर अध्यक्षपदी आकाश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्य उपाध्यक्ष राजुभाऊ उंबरकर व बुलडाणा जिल्हा अध्यक्ष अमित देशमुख यांचे आदेशावरुन तालुकाध्यक्ष डॉ. जयेशराव सातव २३ डिसेंबर रोजी एका पत्रान्वये नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ध्येय धोरणे व कार्यक्रम निष्ठेने राबवून पक्ष संघटन अधिक मजबूत करावे अशी अपेक्षा पत्रात व्यक्त केली आहे.

# अकोल्यात पायलट प्रशिक्षण केंद्राला मंजुरी

◆ खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** अकोल्यात विमान पायलट प्रशिक्षण केंद्राला मंजुरी मिळाली. खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आभार मानले.

अकोलेकरांची शैक्षणिक ओळख डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ तसेच शिवाजी इंजिनिअर कॉलेजसह शैक्षणिक हब यामुळेअकोल्याच्या नावलौकिकातभर पडणार आहे. पायलट प्रशिक्षण केंद्रामुळे अकोल्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी व्यक्त करून अकोलेकरांना नववर्षाची भेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

अकोल्यात ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पश्चिम विदर्भाच्या युवकांना शैक्षणिक दर्जा उंचावून अकोल्यातील विद्यार्थ्यांना मुंबई, चेन्नई जाण्याची गरज भासणार नाही आणि अकोल्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# शासन गावाच्या दिशेने ब्रीदासह जिल्ह्यात सुशासन सप्ताह

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण सेवेतून सुशासन निर्माण होते. त्यामुळे केवळ उपक्रमापुरतेच नव्हे, तर संपूर्ण वर्षभर नागरिकांना वेळेत व दर्जेदार सेवा देऊन सुशासन निर्माण करण्याची जबाबदारी सर्वांनी पार पाडावी, असे प्रतिपादन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर यांनी आज येथे केले.

सुशासन सप्ताहनिमित्त नियोजन भवनात कार्यशाळा झाली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी अनिल चिंचोले यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. परंडेकर म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसंदर्भात नागरिकांना माहिती व्हावी या उद्देशाने ‘प्रशासन गावाच्या दिशेने’ हे ब्रीदवाक्य घेऊन जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. हे लक्षात घेऊन कामे पारदर्शक व जलदरीतीने व्हावीत. प्रत्येक विभागाने आपले सरकार, सीपी ग्राम पोर्टल व पीजी पोर्टलवर आलेल्या नागरिकांच्या तक्रारीचे निवारण तत्काळ करण्याचे आवाहन परंडेकर यांनी केले आहे.

सुशासन सप्ताहामध्ये ’प्रशासन गावाच्या दिशेने’ उपक्रमाच्या माध्यमातून विविध योजनांचे लाभ शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवले जात आहेत. सुशासन सप्ताहाला सर्व स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून वर्षभर नागरिकांच्या तक्रारीचे निरसन जलद गतीने करण्याचे आवाहन कार्यशाळेत करण्यात आले. या वेळी विभागाच्या गुड गव्हर्नन्स उपक्रमाबाबत सादरीकरण केले. सार्वजनिक बांधकाम मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग यांनी अभिलेख व्यवस्थापन व नाविन्यपूर्ण उपक्रम बाबत सादरीकरण केले.

# वसंतराव कसबेकर म्हणजे आधुनिक दधिची : प्रा. रवींद्र भुसारी

प्रतिनिधी २४ डिसेंबर



**अकोला :** स्व. वसंतराव कसबेकरांसारखी समर्पित, ध्येयनिष्ठ, निर्मोही अशी देवमाणसे हीच संघाची अफाट संपत्ती आहे. वसंतराव म्हणजे आधुनिक काळातील दधिची आहेत असे प्रतिपादन प्रा. रविंद्र भुसारी यांनी येथे केले. स्व. वसंतराव कसबेकर स्मृती व्याख्यानमालेचे पुष्प गुंफतांना ते बोलत होते.

संघसागरात हजारो कार्यकर्ते घडले ज्यांनी देव-देश-धर्मासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. स्व. वसंतराव कसबेकर हे त्यापैकी एक होते. सामान्य कुटुंबातला हा मुलगा डॉ. हेडगेवारांपासुन प्रेरीत होवून आपलं जीवन संघाला अर्पण करतो. अकोला-बुलढाणा-वाशिम-नागपूर-गडचिरोली अशा भागांत सन १९५०-६० च्या दशकांत त्यांनी सहकारी बँकांचे जाळे विणले, शाळा-महाविद्यालये उभी केली. आज ही सर्व विद्यालये-बँका अग्रगण्य आहेत. एवढे मोठे कार्य उभे करूनही वसंतरावांनी कुठेही त्याचा गवगवा केला नाही आणी त्याला संघकामाचा एक भाग समजले. समाजासाठी काम करता करता शेवटी त्यांनी आपला देह सुध्दा राष्ट्राला अर्पण केला, अशा प्रेरणादायी पुण्यात्म्यांचे संस्मरण नविन पिढीसमोर आवर्जून झालेच पाहीजे असेही रविजी भुसारी म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला अर्बन बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी होते.पसायदानामृत मासिकाचे अतिथी संपादक प्राचार्य डॉ. शांताराम बुटे प्रमुख अतिथी होते. मान्यवरांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.निशीकांत देशपांडे यांनी केले. दिप प्रज्वलनानंतर मान्यवरांचा स्मृती चिन्ह,शाल व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. काव्य क्षेत्रात ज्यांना नुकतीच मानद आचार्य पदवी मिळाली असे नारायणराव अंधारे यांचाही सत्कार करण्यात आला. अकोल्याचे पूर्व जिल्हा संघचालक स्व. शंकरलालजी उपाख्य काकाजी खंडेलवाल यांच्या जीवनकार्यावर डॉक्टरेट पदवी प्राप्त केलेल्या निशीकांत देशपांडे यांचाही सन्मान करण्यात आला.

२०१५ ते २०२५ ह्या दहा वर्षांत पसायदानामृत मासिकासाठी ज्यांनी कवि, लेखक, प्रतिनिधी व अतिथी संपादक म्हणून मोलाचे योगदान दिले,त्या सर्वांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदावरून बोलतांना शंतनुजी जोशी यांनी अकोला अर्बन बँक स्व. वसंतराव कसबेकर यांच्या मार्गावरच वाटचाल करीत आहे असे सांगितले तर प्रमुख अतिथी डॉ. शांतारामजी बुटे ह्यांनी संतांचे कार्य आणी संघ कार्य हे समाजहिताचे आहे असे सुंदर मनोगत व्यक्त केले आणि ’मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव’ हे भजन गायिले व सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश जोशी यांनी केले तर, आभार प्रदर्शन रामभाऊ भिरड यांनी केले. विनायकराव पांडे यांनी पसायदान सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेश कुळकर्णी, समीर थोडगे, प्रकाश भन्साली, संदीप निकम यांनी परिश्रम घेतले.

# पहिल्याच दिवशी इच्छुकांनी नेले ५०८ उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी २४ डिसेंबर

**अकोला :** महापालिका निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी पहिल्या दिवशी मंगळवारी ५०८ नामनिर्देशन पत्र नेले आहेत. सहा. निवडणूक कार्यालयातून अर्ज नेण्यात आले असून, महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचा ज्वर चढल्याचे दिसत आहे.

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रमांक १ अंतर्गत एकूण ६१ उमेदवारांनी ९३ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रमांक २ अंतर्गत एकूण ५० उमेदवारांनी ९० नामनिर्देशन पत्र, निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रमांक ३ अंतर्गत एकूण ७५ उमेदवारांनी १२६ नामनिर्देशन पत्र, निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रमांक ४ अंतर्गत एकूण ३९ उमेदवारांनी ६२

नामनिर्देशन पत्र, निवडणूक निर्णय अधिकारी झोन क्रमांक ५ अंतर्गत एकूण ३७ उमेदवारांनी ६८ नामनिर्देशन पत्र, झोन सहा मध्ये ३४ उमेदवारांनी ६९ अर्ज नेले. ६ झोनमधून ५०८ नामनिर्देशन पत्र नेण्यात आले आहे.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK